**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/789/2026-27 **दिनांक** :-22/04/2026

# -: परिपत्रक :-

**विषय:- महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा मुख्य परीक्षेकरीता अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पात्र, अपात्र व अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करणेबाबत.**

महाज्योती, संस्थेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा पूर्व परीक्षा 2025 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरीता एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी सदर योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज दि.11/03/2026 ते दि.25/03/2026 रोजी पर्यंत मागविण्यात आले होते. त्यानुसार महाज्योतीच्या संकेतस्थळावर एकूण - 2010 विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामार्फत जाहिरात नं.012/2025 दि.27/02/2026 व दि.04/03/2026 रोजी MPSC ने जाहिर केलेल्या निकालानुसार व महाज्योती कार्यालयाच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून एकूण 1350 विद्यार्थी सदर योजनेकरीता पात्र ठरलेले आहेत. तसेच 593 विद्यार्थी अपात्र (यापूर्वी महाज्योतीच्या इतर अर्थसहाय्य योजनांचा लाभ घेतल्यामुळे) ठरलेले आहेत. त्याचप्रमाणे एकूण - 67 विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्याने सदर विद्यार्थ्यांना अर्जात असलेली त्रुटी पुर्तता करण्याकरिता दि.26/04/2026 रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे. तसेच पात्र, अपात्र व त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्वा

(मिलिंद नारिंगे)

**व्यवस्थापकीय संचालक**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था

(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर